**संयुक्त निवेदन: भारत-बहरीन उच्च संयुक्त आयोगाची 4थी बैठक**

09 डिसेंबर 2024

भारत-बहरीन उच्च संयुक्त आयोगाची (HJC) चौथी बैठक, भारताचे परराष्ट्र व्यवहार मंत्री (EAM) महामहिम डॉ. एस. जयशंकर आणि बहरीनचे परराष्ट्र व्यवहार मंत्री महामहिम डॉ. अब्दुल्लातिफ बिन राशिद अलझयानी यांच्या सह-अध्यक्षतेखाली मनामा, बहरीन येथे 9 डिसेंबर 2024 रोजी आयोजित करण्यात आली होती.

2. भारताचे परराष्ट्र व्यवहार मंत्री महामहिम डॉ. एस. जयशंकर यांनी परराष्ट्र मंत्री महामहिम डॉ. अलझयानी यांच्या निमंत्रणावरून 7 ते 9 डिसेंबर 2024 या कालावधीत बहरीनला भेट दिली. सौहार्दपूर्ण संबंध आणि सखोल द्विपक्षीय बंध प्रतिबिंबित करीत, महामहिम डॉ. एस. जयशंकर यांनी बहरीनचे उपपंतप्रधान महामहिम शेख खालिद बिन अब्दुल्ला अल खलिफा यांची भेट घेतली.

3. HJC ची स्थापना 18-20 फेब्रुवारी 2014 रोजी बहरीनचे राजे महामहिम राजे हमद बिन ईसा अल खलीफा यांच्या भारताच्या राज्य भेटीदरम्यान उभय पक्षांमध्ये झालेल्या सामंजस्य करारानुसार करण्यात आली.

4. महामहिम डॉ. अब्दुल्लातिफ बिन राशिद अल झयानी यांनी भारताचे परराष्ट्र व्यवहार मंत्री, महामहिम डॉ. एस. जयशंकर आणि सोबतच्या शिष्टमंडळाचे बहरीनमध्ये स्वागत केले. त्यांनी 7 एप्रिल 2021 रोजी नवी दिल्ली येथे आयोजित केलेल्या तिसऱ्या HJC साठी भारत भेटीदरम्यान त्यांना आणि त्यांच्या शिष्टमंडळाला दिलेल्या प्रेमळ आदरातिथ्याची आठवण केली. महामहिम डॉ. एस. जयशंकर यांनी त्यांच्या आणि त्यांच्या सोबतच्या शिष्टमंडळाच्या स्वागत आणि विनम्र आदरातिथ्याबद्दल बहरीन पक्षाचे आभार मानले. HJC च्या नियमित बैठकांमधून दोन्ही देशांमधील मजबूत संबंध दिसून येतात याचे उभय पक्षांनी कौतुक केले.

5. उभय पक्षांनी या प्रसंगाचे महत्त्व मान्य केले, जो फेब्रुवारी 2014 मधील महामहिम राजे हमद बिन ईसा अल खलीफा यांच्या भारताच्या ऐतिहासिक भेटीचा 10वा वर्धापन दिन आहे आणि ऑगस्ट 2019 मधील भारताचे माननीय पंतप्रधान महामहिम श्री नरेंद्र मोदी यांच्या बहरीन भेटीचा 5वा वर्धापन दिन आहे. दीर्घकालीन द्विपक्षीय संबंधांना नवीन गती देण्यात या भेटींची भूमिका मान्य करण्यात आली. EAM नी महामहिम युवराज, प्रिन्स सलमान बिन हमद अल खलीफा आणि बहरीन राज्याचे पंतप्रधान यांना लवकरात लवकर भारत भेट देण्याच्या माननीय पंतप्रधानांच्या आमंत्रणाचा पुनरुच्चार केला.

6. बहरीन पक्षाने पंतप्रधान महामहिम श्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील नवीन भारत सरकारच्या शपथविधीपासून वाढलेल्या राजकीय प्रतिबद्धतेचे कौतुक केले. EAM नी युवराज, महामहिम प्रिन्स सलमान बिन हमद अल खलीफा आणि पंतप्रधानांनी नवीन सरकारला दिलेल्या अभिनंदन संदेशाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आणि द्विपक्षीय संबंधांची गती सुरू ठेवण्याचे वचन दिले.

7. दोन्ही मंत्र्यांनी एप्रिल 2021 मध्ये आयोजित तिसऱ्या HJC दरम्यान आणि मार्च 2022 आणि मे 2023 मध्ये आयोजित त्यानंतरच्या पाचव्या आणि सहाव्या परराष्ट्र कार्यालयाच्या सल्लामसलतीच्या अनुषंगाने केलेल्या चर्चेनुसार द्विपक्षीय संबंधांमध्ये साध्य केलेल्या प्रगतीची प्रशंसा केली. उभय पक्षांनी उच्चस्तरीय द्विपक्षीय भेटी आणि बैठकांची गती सुरू ठेवण्यास सहमती दर्शविली आणि दोन्ही मित्र देशांमधील नियमित उच्च-स्तरीय देवाणघेवाणीबद्दल समाधान व्यक्त केले.

8. ऊर्जा आणि हायड्रोकार्बन्स, नूतनीकरणीय ऊर्जा, पायाभूत सुविधा, व्यापार आणि गुंतवणूक, संरक्षण आणि सुरक्षा, आरोग्य, अन्न आणि कृषी, आतिथ्य, औषधनिर्माण उद्योग, इलेक्ट्रॉनिक उद्योग, डाउनस्ट्रीम ॲल्युमिनियम, IT आणि डाटा सेंटर्स, अंतराळ, पर्यटन, पर्यावरण, युवक आणि क्रीडा यासह विविध क्षेत्रांमध्ये सहकार्याचे मार्ग शोधण्यासाठी दोन्ही मंत्र्यांनी आपल्या वचनबद्धतेची पुन्हा पुष्टी केली.

9. ऐतिहासिक राज्य भेटींपासून राजकीय आणि दोन राष्ट्रांतील नागरिकांचे परस्पर संबंध अधिक दृढ झाल्याचे उभय पक्षांनी मान्य केले. 2019 मध्ये माननीय पंतप्रधानांच्या राज्य भेटीपासून बहरीनमध्ये भारतीय गुंतवणुकीत वाढ झाल्याचे भारतीय पक्षाने अधोरेखित केले. मार्च 2023 आणि डिसेंबर 2024 मध्ये बहरीनचे उद्योग आणि वाणिज्य मंत्री महामहिम अब्दुल्ला बिन अदेल फाखरो यांच्या नेतृत्वाखालील भारत दौरा आणि सप्टेंबर 2024 मध्ये शाश्वत विकास मंत्री आणि बहरीन EDB च्या मुख्य कार्याधिकारी महामहिम नूर बिन्त अली अल खुलैफ यांच्या नेतृत्वाखालील दौऱ्यासह व्यापारी शिष्टमंडळांच्या भेटींचे उभय पक्षांनी स्वागत केले. बहरीन पक्षाने भारतीय गुंतवणुकींचे आणि विशेषत: 2024 च्या सुरुवातीपासून बहरीनमधील जागतिक भारतीय ब्रँड्सच्या आगमनाचे स्वागत केले.

10. द्विपक्षीय व्यापारातील स्थिरता, शाश्वतता आणि वैविध्य यावर देखील उभय पक्षांनी समाधान व्यक्त केले. त्यांनी हे व्यापार आणि गुंतवणूक संबंध मजबूत करण्याच्या दिशेने काम करण्यास सहमती दर्शविली आणि या संदर्भात व्यापार आणि गुंतवणुकीवर द्विपक्षीय संयुक्त कार्यगट तयार करण्याच्या दिशेने काम करण्याचे मान्य केले.

11. बहरीनची राष्ट्रीय मानकीकरण संस्था आणि राष्ट्रीय चाचणी केंद्राचे उद्दिष्ट माहिती आणि अधिकृत टिप्पण्यांची देवाणघेवाण करून आणि मानकांचा विकास, अनुरूपता मूल्यांकन, मापनविज्ञान, मान्यता,

धातुपरीक्षा, मोती आणि रत्न चाचणी क्रियाकलाप यातील संधी आणि अडथळे ओळखून भारतीय मानकीकरण संस्था आणि भारतातील संबंधित अधिकृत संस्थांना सहकार्य करण्याचे आहे.

12. बहरीनने भारतासोबत दुहेरी करप्रणाली (DTA) काढून टाकण्यासाठी द्विपक्षीय करार पूर्ण करण्याच्या इच्छेला पुन्हा चालना दिली आहे, ज्याचा उद्देश करविषयक बाबींमध्ये सहकार्य मजबूत करणे आणि दोन मित्र देशांमधील आर्थिक, व्यावसायिक आणि गुंतवणुकीच्या संधी विकसित करणे आहे.

13.  3 - 4 सप्टेंबर 2024 रोजी झालेल्या द्विपक्षीय गुंतवणूक कराराच्या वाटाघाटीच्या उद्‌घाटनाचे दोन्ही बाजूंनी स्वागत केले आणि लवकर निष्कर्ष काढण्यासाठी काम करण्याचे मान्य केले.

14.  बहरीनमध्ये भारतीय रुपे कार्ड लवकरात लवकर स्वीकारण्यासाठी वाटाघाटी जलद करण्यास दोन्ही मंत्र्यांनी सहमती दर्शवली.  त्यांनी फिनटेक आणि डिजिटल पेमेंट्सच्या क्षेत्रात घनिष्ठ सहकार्यासाठी काम करण्यासही सहमती दर्शवली.

15.  उभय पक्षांनी आरोग्य आणि औषधनिर्माण क्षेत्रातील द्विपक्षीय सहकार्याच्या महत्त्वावर भर दिला आणि 22 फेब्रुवारी 2022 रोजी झालेल्या आरोग्यसेवा सहकार्यावरील संयुक्त कार्यगटाच्या (JWG) पहिल्या यशस्वी बैठकीबद्दल समाधान व्यक्त केले. देशाची राष्ट्रीय धोरणे, नियम आणि कायदेशीर चौकटींनुसार घेतलेल्या निर्णयांच्या अंमलबजावणीच्या दिशेने काम करण्याचे मान्य करण्यात आले आणि दोन्ही देशांची आरोग्य मंत्रालये आरोग्य सेवा सहकार्यावर JWG ची दुसरी बैठक लवकरात लवकर आयोजित करण्याच्या दिशेने काम करत असल्याची समाधानपूर्वक नोंद घेतली गेली.

16.  भारतीय पक्षाने जागतिक नेतृत्वापैकी एक म्हणून भारतीय औषधनिर्माण उद्योगाची भूमिका अधोरेखित केली आणि बहरीनच्या स्थापित नियामक आवश्यकतांचे पालन करून बहरीनच्या बाजारपेठेत भारतीय औषधीय उत्पादनांच्या बाजारपेठेतील प्रवेशाचे महत्त्व सांगितले.  औषधनिर्माण, लसी आणि वैद्यकीय उपकरणांमध्ये व्यापार वाढवण्यासाठी दोन्ही देशांच्या खाजगी क्षेत्रांना सुकर करण्यावर उभय पक्षांनी सहमती दर्शवली.

17.  दोन्ही मंत्र्यांनी वैद्यकीय पर्यटनाचे केंद्र म्हणून दोन्ही देशांची स्थिती पुढे नेण्यासाठी सहकार्यासाठी लक्षणीय उपलभ्यता असल्याचे मान्य केले.

18.  उभय पक्षांनी कृषी आणि पशुधन क्षेत्राच्या विकासासाठी सहकार्य वाढविण्यावर भर दिला. भारतीय पक्षाने भारतातील फूड पार्क्समधील गुंतवणुकीसाठी आणि भारतातून बहरीनमध्ये अन्न निर्यात वाढवण्याच्या महत्त्वपूर्ण संधींवर प्रकाश टाकला. बहरीन पक्षाने अन्न सुरक्षा साध्य करण्याच्या उद्देशाने द्विपक्षीय प्रकल्पांना चालना देण्यासाठी दोन्ही देशांमधील अनुभवांची देवाणघेवाण करण्याच्या महत्त्वावर भर दिला.

19. ऊर्जा बहरीन आणि भारत यांच्यातील भागीदारीचे ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे क्षेत्र राहिले आहे. उभय पक्षांनी या सहकार्याचा महत्त्वाचा घटक म्हणून हायड्रोकार्बन व्यापाराच्या महत्त्वाला मान्यता दिली, जे परस्पर ऊर्जा सुरक्षा आणि आर्थिक वाढीस हातभार लावते. बहरीनमधील विशेषतः तेल आणि वायूच्या अपस्ट्रीम आणि डाउनस्ट्रीम क्षेत्रात ऊर्जा सहकार्य वाढवण्यासाठी आणि विस्तारित व्यापार, संयुक्त उपक्रम आणि परस्पर गुंतवणुकीसाठी मार्ग शोधण्यासाठी दोघांनी वचनबद्धता घेतली.

20.  2018 मध्ये सामंजस्य करारावर स्वाक्षरी झाल्यापासून अक्षय ऊर्जा क्षेत्रातील समाधानकारक द्विपक्षीय घडामोडींची उभय पक्षांनी नोंद घेतली आणि संयुक्त कार्यगटाची 2री बैठक लवकरात लवकर घेण्यावर सहमती दर्शवली. द्विपक्षीय सहभागामध्ये विशेषत: सौर, पवन, हरित हायड्रोजन आणि ग्रीन अमोनिया या क्षेत्रात सरकारी संस्था आणि खाजगी क्षेत्राला गुंतवून सहकार्य वाढविण्याचे त्यांनी मान्य केले.  परराष्ट्र मंत्र्यांनी 2022 मध्ये बहरीन आंतरराष्ट्रीय सौर युती (ISA) चे सदस्य झाल्याची आठवण केली.

21.  ISRO (भारतीय अंतराळ संशोधन संस्था) आणि बहरीनच्या NSSA (नॅशनल स्पेस सायन्स एजन्सी) यांनी नॅनो/क्यूब-सॅटेलाइट तयार करणे आणि प्रक्षेपित करणे यात सहयोग वाढवल्याबद्दल आणि बहरीनला क्षमता वाढीसाठी सहाय्य प्रदान करण्याबद्दल दोन्ही मंत्र्यांनी समाधान व्यक्त केले. उभय पक्ष सध्या अंतराळ क्षेत्रातील सहकार्य अधिक बळकट करण्यासाठी NSSA आणि NSIL (न्यू स्पेस इंडिया लिमिटेड) यांच्यातील सामंजस्य कराराच्या मसुद्याला अंतिम रूप देण्यावर काम करत आहेत.

22.  दोन्ही देशांमधील संरक्षण सहकार्य विकसित आणि बळकट करण्याच्या दिशेने काम करण्यास उभय पक्षांनी सहमती दर्शविली, ज्यामध्ये दोन्ही देशांच्या सशस्त्र दलांमधील सामंजस्य करारावर स्वाक्षरी करणे समाविष्ट असू शकते. याव्यतिरिक्त, बहरीनने 2023 मध्ये बहरीनमध्ये मुख्यालय असलेल्या संयुक्त सागरी दलात भारताने सामील होण्याचे स्वागत केले. नोव्हेंबर 2024 मध्ये 7व्या बहरीन इंटरनॅशनल एअर शो (BIAS) मध्ये 05 ध्रुव हेलिकॉप्टरचा समावेश असलेल्या भारतीय वायुसेनेच्या सारंग एरोबॅटिक संघाच्या सहभागाबद्दल बहरीनने कौतुक केले.

23.  भारतीय पक्षाने मान्य केले की द्विपक्षीय सुरक्षा संवाद आणि संयुक्त सुकाणू समिती (JSC) आंतरराष्ट्रीय दहशतवादाशी लढा देण्याच्या क्षेत्रात, सायबर सुरक्षेसह सुरक्षा सहकार्याच्या क्षेत्रात सहकार्याचे संस्थात्मकीकरण करण्यासाठी महत्त्वपूर्ण यंत्रणा आहेत. दोन्ही बाजूंनी तिसरा सुरक्षा संवाद आणि तिसरी JSC लवकरात लवकर आयोजित करण्याचे मान्य केले.

24.  दोन्ही मंत्र्यांनी सर्व प्रकार आणि प्रकटीकरणामधील दहशतवादाचा निषेध केला आणि सर्व राज्यांना इतर देशांविरुद्ध दहशतवादाचा वापर नाकारण्याचे आणि त्यागण्याचे आवाहन केले.

25.  दोन्ही देशांमधील एक महत्त्वाचा दुवा म्हणून बहरीनमधील भारतीय समुदायाच्या भूमिकेचे आणि बहरीन राज्याच्या विकासात त्यांच्या महत्त्वपूर्ण योगदानाचे उभय पक्षांनी कौतुक केले. भारतीय पक्षाने राज्याच्या सहिष्णुता आणि शांततापूर्ण सहअस्तित्वाच्या उदारमतवादी धोरणांची तसेच बहरीनला भारतीय व्यावसायिक आणि कामगार आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी एक पसंतीचे ठिकाण बनवण्याबद्दल त्यांच्या अतिशय सौहार्दपूर्ण समाजाची प्रशंसा केली. उभय पक्षांनी कोविड-19 महामारी दरम्यान घनिष्ठ सहकार्याची कबुली दिली, ज्यामुळे त्याचा प्रभाव कमी करण्यात मदत झाली. बहरीनच्या औदार्याचे दर्शन घडवणारी 125 हून अधिक भारतीय कैद्यांना शाही माफी दिल्याबद्दल भारतीय पक्षाने बहरीनच्या नेतृत्वाचे आणि सरकारचे आभार मानले.

26.  दोन्ही परराष्ट्र मंत्र्यांनी दुतर्फा पर्यटनात झपाट्याने झालेल्या वाढीबद्दल आणि त्याच्या दोन राष्ट्रांतील नागरिकांचे परस्पर संबंध दृढ करण्यावर आणि दोन्ही देशांमधील व्यापार आणि आर्थिक संबंधांवर झालेल्या प्रभावाबद्दल समाधान व्यक्त केले.

27.  उभय पक्षांनी वाणिज्यदूतीय मुद्द्यांवर सहकार्य वाढविण्यास देखील सहमती दर्शविली आणि वाणिज्यदूतीय व्यवहारांमध्ये परस्पर हिताच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी आणि वाणिज्यदूतीय मुद्द्यांमध्ये सहकार्य मजबूत करण्यासाठी संयुक्त वाणिज्यदूतीय समिती स्थापन करण्याच्या निर्णयाचे स्वागत केले.

28. उभय पक्षांनी 2019-23 साठी त्यांनी स्वाक्षरी केलेल्या सांस्कृतिक विनिमय कार्यक्रमाची (CEP) आठवण केली आणि ऐतिहासिक सांस्कृतिक संबंध मजबूत करण्यासाठी CEP च्या अंमलबजावणीबद्दल आनंद व्यक्त केला. जुलै 2024 मध्ये नवी दिल्ली येथे UNESCO च्या 46व्या WHC साठी महामहिम शेख खलीफा बिन अहमद बिन अब्दुल्ला अल खलीफा यांच्या भारताच्या यशस्वी भेटीबद्दल आणि सांस्कृतिक क्षेत्रात द्विपक्षीय सहकार्य पुढे नेण्यासाठी भारतीय प्रजासत्ताकचे सांस्कृतिक आणि पर्यटन मंत्री महामहिम गजेंद्र सिंह शेखावत यांच्याशी त्यांच्या भेटीबद्दल EAM नी आनंद व्यक्त केला. "2025-

2029 या कालावधीसाठी सांस्कृतिक देवाणघेवाण कार्यक्रमाच्या" नूतनीकरणाबाबत चर्चा सुरू ठेवण्यास उभ्या पक्षांनी सहमती दर्शवली.

29.  उभय पक्षांनी शिक्षण क्षेत्रात द्विपक्षीय सहकार्याची व्याप्ती वाढवण्यास देखील सहमती दर्शवली. या संदर्भात, भारतीय पक्षाने भारतीय प्रजासत्ताकातील आघाडीच्या उच्च शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या अधिक बहरीन विद्यार्थ्यांचे स्वागत केले. उभय पक्षांनी शैक्षणिक सहकार्य वाढविण्यासाठी दोन्ही सरकारांमधील सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यासाठी काम करण्याच्या महत्त्वावर भर दिला.

30.  "वसुधैव कुटुंबकम: एक पृथ्वी, एक कुटुंब, एक भविष्य" या थीममध्ये आयोजित करण्यात आलेल्या G20 शिखर परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी बहरीन पक्षाने भारताचे अभिनंदन केले. भारतीय पक्षाने Y-20 शिखर परिषदेमध्ये बहरीनच्या सहभागासाठी कृतज्ञता व्यक्त केली.

31. EAM नी "व्हॉईस ऑफ ग्लोबल साऊथ" शिखर परिषदेच्या तीनही आवृत्त्यांमध्ये बहरीनच्या सहभागाचे कौतुक केले, जे ग्लोबल साऊथच्या देशांना त्यांचे विकास दृष्टीकोन आणि प्राधान्यक्रम सामायिक करण्यासाठी एकत्र आणण्याच्या वचनबद्धतेला प्रतिबिंबित करते. ऑगस्ट 2024 मध्ये आयोजित 3ऱ्या व्हॉईस ऑफ ग्लोबल साऊथ शिखर परिषदेच्या "ग्लोबल साऊथ आणि ग्लोबल गव्हर्नन्स" या विषयावरील परराष्ट्र मंत्र्यांच्या सत्रात त्यांचे मौल्यवान दृष्टीकोन आणि कल्पना सामायिक केल्याबद्दल EAM नी महामहिम डॉ. अब्दुल्लातिफ बिन राशिद अल झयानी यांचे आभार मानले आणि हे नमूद केले की दोन्ही देशांमध्ये अनेक समकालीन जागतिक मुद्द्यांवर मजबूत समाभिरूपता आहे, ज्यात प्रभावी जागतिक प्रशासन सुधारणांची गरज आणि जागतिक दक्षिण देशांना स्वच्छ आणि हरित तंत्रज्ञानाच्या समन्याय उपलब्धतेच्या आवश्यकतेचा समावेश आहे.

32. या वर्षी अरब लीगचे अध्यक्षपद स्वीकारल्याबद्दल भारतीय पक्षाने बहरीनचे अभिनंदन केले आणि मे 2024 मध्ये मनामा येथे अरब लीग शिखर परिषदेच्या विलक्षण आयोजनाचे कौतुक केले. सप्टेंबर 2024 मध्ये रियाध येथे झालेल्या धोरणात्मक संवादासाठी भारत - GCC संयुक्त मंत्रिस्तरीय बैठक यशस्वी झाल्याच्या पार्श्वभूमीवर बहरीन GCC देशांसोबत भारताचे मजबूत संबंध बळकट करण्यासाठी भागीदार राहील अशी आशा भारतीय पक्षाने व्यक्त केली.

33.  उभय पक्षांनी महत्त्वाच्या जागतिक घडामोडी, प्रादेशिक आणि परस्पर हिताच्या बहुपक्षीय मुद्द्यांवर चर्चा केली.  पश्चिम आशियात अधिक शांततापूर्ण आणि सर्वसमावेशक जागतिक समुदायाला प्रोत्साहन देण्यासाठी दोन्ही देश एकमेकांना या प्रदेशातील प्रमुख भागीदार म्हणून पाहतात. मध्यपूर्वेतील शांततेसाठी आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्याच्या बहरीन पक्षाच्या प्रस्तावाचे भारतीय पक्षाने स्वागत केले.

34.  उभय पक्षांनी परराष्ट्र कार्यालय सल्लामसलती (FOCs) आणि मनुष्यबळ आणि विकास यावरील सामंजस्य करारांतर्गत संयुक्त समितीच्या बैठकांसह विद्यमान द्विपक्षीय यंत्रणांच्या लवकर बैठका घेण्याच्या महत्त्वावर भर दिला. HJC च्या निर्णयांचा पाठपुरावा करण्यासाठी सातवी FOC परस्पर सोयीस्कर तारखेला नवी दिल्ली येथे आयोजित करावी यावर सहमती झाली.

35.  उच्च संयुक्त आयोगाची पाचवी बैठक भारतात घेतली जाईल, ज्याच्या तारखा राजनैतिक माध्यमातून ठरवल्या जातील यावर सहमती झाली.

**मनामा,**

**09 डिसेंबर 2024**